# गोमंतक मराठा समाज - गोवा

# त्रैमासिक मुखपत्रिका

ऑक्टोबर–डिसेंबर २०१९

# कै. श्रीमती शशिकलाताई काकोडकर जयंती



आपल्या समाजाच्या आधारस्तंभ, गोमंतकाच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री मा. श्रीमती शशिकलाताई काकोडकर यांची ८५ वी जयंती मंगळवार दि. ७ जानेवारी २०२० रोजी साजरी करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

या जयंती सोहळ्यानिमित्त गोमंतकातील सर्व महिला पंचसदस्यांना एकत्रित करून 'स्त्री सशक्तीकरण व्हावे' या उद्देशाने वक्तृत्व स्पर्धा, परिसंवाद, सन्मान, सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. तत्संबंधीचे प्राथमिक काम सुरु करण्यात आले आहे.

सर्व समाजबांधव व तालुका समिती आणि खास करून प्रत्येक तालुका महिला समितीना आवाहन करण्यात येत आहे की या सोहळ्यास आपणां सर्वांची उपस्थिती प्रार्थनीय आहे. महिला सशक्तीकरणाच्या या कार्यक्रमास आपणा सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

सविस्तर कार्यक्रम आपणांस पाठवला जाईल.

**आपली**
**कार्यकारी समिती, गोवा**

## अध्यक्षांचे मनोगत

# कार्यकर्ता आणि समाज कार्य

ईश्वराच्या कृपेने मनुष्य जन्म झाला असेल तर त्यामागे ईश्वराचे काही कारण असेल आणि ते पूर्ण करण्यासाठी मनुष्याला जन्म दिला असेल. माणसाचे जीवन व त्याचे कार्य समाजाला उपयोगी पडले असेल तर मनुष्याच्या जीवनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

माणसाने स्वत:चा उत्कर्ष करावाच पण त्याहीपेक्षा इतर माणसाबद्दल प्रेम, सद्भावना व सहकार्य करून जर मदत केली तर मनुष्याच्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो. जर समाज, समाजकार्य, कार्यकर्ता आणि समाजबांधव यांचा योग्य समन्वय झाला तर खऱ्या अर्थाने मनुष्याचे व्यक्तिमत्व इतरांसमोर प्रकर्षाने दिसून येते.

मित्रांनो, सक्रीय कार्यकर्ता समाजकार्य करते वेळी आपले स्वत:चे कार्य बाजूला ठेऊन समाज संस्थेच्या कार्याला प्राधान्य देतो, हेच परमकर्तव्य प्रत्येक समाजाच्या कार्यकर्त्याचे असायला हवे, कारण आपल्या व्यक्तिगत कार्यापेक्षा संस्थेचे कार्य अनेक बांधवांचे असते, त्यामुळे आपले काम बाजूला ठेऊन इतरांचे भले करण्यासाठी झटतो, तोच समाजबांधव किंवा व्यक्ति ही आदर्श व्यक्ती होऊ शकते.

आता संस्थेच्या कार्याचा विस्तार होत आहे, त्यामुळे नवीन समिती घडविण्यात सक्रीय समाज बांधवांची आवश्यकता आहे, त्यामुळे आपण किती वेळ देऊ शकतो किंवा आपली जबाबदारी आपण कशी पेलू शकतो किंवा आपण आपल्या पदाला कसा न्याय देऊ शकतो याचा सारासार विचार करूनच आपले पाऊल पुढे ठेवणे यातच शहाणपणा आहे का? सर्व समाजबांधवाना या समाजकार्यात सहभागी होण्यासाठी विनम्र आवाहन करण्यात येत आहे. धन्यवाद!

**श्री. गोरख रा. मांद्रेकर**
अध्यक्ष
९९६०४०१९२०

## Election of the Gomantak Maratha Samaj Central Committee for the period 2020-2023

| | | |
|---|---|---|
| Election Officer | : | Adv. Suresh Kankonkar |
| Assistants | : | 1) Shri. Rohidas Naik |
| | | 2) Shri. Avinash Shinde |

### Election Programme

1. Nomination forms will be available from 02.03.2020 in the office during office time.

| | | |
|---|---|---|
| 2. Receipt of forms from Contestants in GMS Office | : | 09.03.2020 to 14.03.2020 |
| Time | : | 11.00 a.m. to 05.00 p.m. on Working days |
| 3. Scrutiny of Forms | : | 16.03.2020 in GMS Office |
| Time | : | 11.00 a.m. to 01.00 p.m. |
| 4. Withdrawal of nomination forms | : | 20.03.2020 in GMS Office |
| Time | : | 11.00 a.m. to 04.00 p.m. |
| 5. Publication of final list of candidates | : | 20.03.2020 in GMS Office |
| Time | : | At 05.00 p.m. |
| 6. Election date & time | : | 05.04.2020 from 11.00 a.m. to 03.00 p.m. |
| 7. Declaration of results | : | Immediately after the election. |

**Eligibility of the Candidates :**

1. The members who have registered on or before 31st March 2019 are eligible to file the nomination forms.
2. The members who want to file the nomation form for the post of President, Secretary and Treasurer should have worked for at least one term on taluka committee or central committee as a member.
3. The members who have registered on or before 31st January 2020 are eligible to vote for the election.
4. Final list of the members will be available in the GMS Office from 10th February 2020 during office hours.
5. Final list of the candidates will be displayed on the Notice Board.

**sd/-**
**Election Officer**

# उत्कृष्ट समाजसेविका सौ. विंदा केशव नाईक
# पणजी–गोवा



सौ. विंदा नाईक यांची 'आंतरराष्ट्रीय वरिष्ठ नागरीक' म्हणून निवड झाल्याबद्दल २ ऑक्टोबर २०१९ 'आंतरराष्ट्रीय वरिष्ठ नागरीक' दिनी माननीय मुख्यमंत्री – गोवा डॉ. प्रमोद सावंत यांच्या शुभहस्ते रविंद्र भवन सांखळी येथे सत्कार संपन्न.

गेल्या १९८० सालापासून दिर्घकाळ–२ तपापेक्षा जास्त काळ गरीब व गरजू व्यक्तिंना मोफत रक्तदान केल्याबद्दल सौ. विंदा केशव नाईक यांना गोवा सरकार व गोमंतक मराठा समाज– गोवाच्या वतीने माननीय मुख्यमंत्री–गोवा श्री. मनोहर पर्रीकर यांच्या शुभहस्ते १९ डिसेंबर २०१२ मुक्तीदिनी 'उत्कृष्ठ समाजसेविका' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

त्यानंतर त्यांची 'आंतरराष्ट्रीय वरिष्ठ नागरीक' म्हणून निवड झाल्याबद्दल १ ऑक्टोबर २०१९ रोजी 'आंतरराष्ट्रीय वरिष्ठ नागरीक दिनी माननीय समाज कल्याण मंत्री गोवा श्री. मिलींद नाईक यांच्या उपस्थितीत माननीय मुख्यमंत्री गोवा डॉ. प्रमोद सावंत यांच्या शुभहस्ते रविंद्र भवन, सांखळी येथे सत्कार करण्यात आला.

1. She is a Housewife cum Social Worker.
2. She has organized many Bhajan Programs with the help of Pundalik Nagar Mahila Bhajani Mandal.
3. She has donated blood to the needy patients. She also makes arrangements for people who are in need of blood emergency by serving them the blood donation card.
4. She was also awarded 'Samajik Sewa' award in 2016 by International Human Rights Justice Federation (Maharashtra/ Goa) for the purpose of Blood Donation.
5. She was also felicitated by NGO Gomantak Maratha Samaj Goa at the hands of the then Hon. Chief Minister of Goa.
6. She was awarded for Matrimonial for helping numerous eligible candidates in marriage by Gomantak Maratha Samaj, Panaji.
7. She organized National and International Tours.
8. She had participated in Personality Contest published by Daily Gomantak and Daily Lokmat and won the title of Mrs. Gomantak special award and Shakhi Samradhani 2012 (crown (Taj) Award by securing 1st Prize with crown.
9. She has participated in many recipe shows and has won many kitchen queen contests such as all Goa Food Dhamaka Veg. Mejwani prize in 2014.
10. She has also channeled TV shows on Goa 365 - Aswad, on HCN Channel - Mhana Moraya Project 2014 consisting of 5 different episodes with entertainment programs in Marathi and Konkani.
11. She has published Marathi Katha & Poem in Goa Doot, she has also displayed Konkani Poem on Youtube. She has also got 1st Prize for the Konkani Devotional song of Lord Ganesh.
12. She has also published books of Konkani and Marathi Poems - Kavya Phulam and Kavya Vel.

■■■

# स्व. श्रीधर पार्सेकर जन्म शताब्दी वर्ष
# झाले बहु, होतील बहु परी.......



स्थळ गिरगांव लक्षीबाग हॉल, श्रीधर पार्सेकर आज या लक्षीबाग हॉलमध्ये व्हायोलीनवादनाचा कार्यक्रम सादर करणार, असे जाहीर झाल्यामुळे कार्यक्रम सुरु होण्याच्या वेळेपूर्वी, अगोदरच रसिक प्रेक्षक मोक्याची जागा मिळावी म्हणून हॉलवर हजर. तमाम रसिकांमधे प्रचंड उत्सुकता, ठरलेल्या वेळेवर पार्सेकरांचा हॉलवर प्रवेश. भव्य कपाळ, पेहराव अगदी साधा, गर्विष्ठपणाचा लवलेशही नाही. प्रचंड आत्मविश्वास, जशी व्हायोलीनची तार छेडली गेली आणि कार्यक्रमाला सुरुवात झाली तशी हॉलमध्ये गर्दी केलेल्या शेकडो रसिकांनी टाळ्यांच्या गजरात पार्सेकरांचे स्वागत केले. आणि पुढचे तीन तास पार्सेकरांनी वाजविलेल्या 'पूरिया धनश्री' ऐकून रसिक मनोमनी तृप्त झाले. व्वा पार्सेकर वाहव्वा अशी एकमुखाने दाद देत कार्यक्रम संपन्न झाला.

मुंबईच्या रेडियो संमेलनातला 'अहिर भैरव' सी. जे. हॉलमधला 'मिया मल्हार', दादरच्या वनमाळी हॉलमधला 'दरबारी कानडा' अशा अनेक पार्सेकरांच्या गाजलेल्या जलशांची आठवण श्रोतृवन्दांच्या अंत:करणात आजही तशीच आहे.

१९२० साली पार्से गावांत जन्मलेल्या पार्सेकरांच्या घराण्यात संगीताची जाण आणि संगीतावर प्रेम असणारी अशी पार्श्वभूमी होती. गोव्यात जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तिला गायन-वादन मनापासून आवडते, पण राजकीय राजवटीच्या त्या काळात, कला आणि कलावंत यांना, प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या समाजात कनिष्ठ असे स्थान होते, तसेच त्या काळी काही रूढींचे कुंपण असल्यामुळे प्रतिष्ठीत समजला जाणारा समाज या कलेपासून दूर राहिला पण गोमंतक मराठा नावाने ओळखल्या जाणाऱ्या कलावंत समाजाने आपल्यापाशी उपजत असलेल्या कलांगुणांचा विकास गोमंतकाबाहेर जाऊन साधला, त्याचे प्रथम श्रेय मुरारबा पेडणेकरांना जाते. श्रीमती सरस्वतीबाई बांदोडकर, श्रीमती शाणेबाई रामनाथकर, श्रीमती जयाबाई मानरेकर, श्रीमती जोस्नाबाई भोळे, श्रीमती अंजनीबाई मालपेकर अशा कितीतरी कलावंतानी गोमंतकाबाहेर जाऊन आणि प्रचंड मेहनतीने आपल्या कलागुणांचा विकास केला. आणि भारतभर नाव आणि किर्ती मिळविली, आणि हे कलावंत जेव्हा यशस्वी होऊ लागले. आणि आसमंतात त्यांचे नाव दुमदूमू लागले तेव्हा बाकीच्या समाजाला जाग आली. असो.

पार्सेकरही वयाच्या १२/१३ व्या वर्षी आपले काका कै. परशुरामबुवा पार्सेकर यांच्याबरोबर मुंबईला गेले व कै. मधुकर पेडणेकर यांच्या ओळखीने गजाननबुवा जोशी यांच्या विद्यालयात व्हायोलीन वादनाचे धडे घेऊ लागले. आणि थोड्यात अवधित व्हायोलीन वादनात त्याने चांगलीच प्रगती केली. मधुकर पेडणेकर त्या काळी संगीत दिग्दर्शक अण्णासाहेब माईणकर यांच्याकडे सहाय्यक म्हणून काम करीत होते. त्यांनी माईणकरांकडे पार्सेकरांच्या व्हायोलीनचा साथीचा उपयोग करून घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे पार्सेकरांना थोडी पैशांची प्राप्ती होऊ लागली. पुढे आग्रा घराण्याचे प्रसिध्द गायक व

शिक्षक खाँसाहेब खादिम हुसेन खाँ व खाँसाहेब नत्थन खाँ व अन्वर हुसेन यांच्याकडे ही पार्सेकरांनी अधिक शिक्षण घेतले. थोडी वर्षे आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावर सहाय्यक म्हणून नोकरी केल्यावर पार्सेकरांनी स्वतंत्र असे सोलो वादनाचे कार्यक्रम करण्यास सुरुवात केली. आणि हे कार्यक्रम फारच श्रवणीय ठरत. एखाद्या वाद्यावर हुकूमत मिळवायची म्हणजे त्या वाद्यातले सगळे तांत्रिक गुणदोष त्याचा लहरीपणा, आरवाडे, बारकावे हे नीट ओळखून रोजच्या अभ्यासाने त्या वाद्याची पुरती ओलख करून घ्यायची व आपल्याला हवे ते सूर काढायचे पार्सेकरांनी आपल्या व्हायोलीनच्या चार तारांत बिस्मीलांच्या सनईतल्या बंदूखाँच्या सारंगीतल्या, रविशंकर व विलायतखाँ यांच्या सतारीतल्या विविध लकबी सहजतेने आत्मसात केल्या होत्या.

हळू हळू थोरांच्या मैफिलीत पार्सेकरांनी स्थान मिळविले. १९४० मध्ये चित्रपट सृष्टीत संगीत दिग्दर्शक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. 'भक्त दामाजी', 'पैसा बोलतो आहे', 'कुबेर', 'वहिनी' वगैरे चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन केले. 'कन्यादान', 'माझे घर', 'हिमालयाची बायको', 'तुझं माझं जमेना' या नाटकांना संगीत दिले. 'मेरी अमानत', 'अंधोका सहारा' या चित्रपटातील एक गाणे गायिका मोहनतारा हिजबरोबर स्वत: गायिले. पु. ल. देशपांडे यांनी 'वहिनी' या चित्रपटासाठी पार्सेकरांनी संगीतबद्ध केलेले एक गाणे गायिले आहे. पार्सेकरांना आता बोलायची देखील फुरसत मिळत नसे. लखनऊ, अलाहाबाद, अहमदाबाद, दिल्ली असे त्यांचे कार्यक्रम सारखे चालू होते. लोक त्यांच्या गुणांचे आता चाहते झाले होते. नियतीने पैसा आणि किर्ती असो दोन्ही ही त्यांच्या दाराशी आणून ठेवले होते. १९४८ साली 'स्वर-निनाद' या नावाचे व्हायोलीन वादनाचे धडे देणारे पुस्तकही त्यांनी लिहिले व प्रसिद्ध केले.

पार्सेकरांना देवाने स्वर दिला, ताल दिला, ज्ञान दिले. हेवा वाटावा असा अल्पावधीत लौकीकही दिला. ते जिथे जिथे जात, कार्यक्रम सादर करीत, तिथे तिथे लोक त्यांना वाखाणत असत. स्वत:च्या मोटारीतून एखाद्या अमीरासारखे ते रुबाबदारपणे फिरत. स्वत:च्या कष्टाने ते वाढले, फार मोठी किर्ती मिळविली. थोर कलावंतांच्या यादीत त्यांचे नाव प्रथम श्रेणीत राहिले. ज्या नियतीने त्यांना वरदान देऊन वैभवसंपन्न केले, त्याच नियतीने आता त्यांच्याकडे पाठ फिरवीली. नको असलेल्या व्यसनाच्या अधीन झाल्यामुळे त्यांचे कार्यक्रम निरस होऊ लागले. त्यातच त्यांचा लौकिक डोळ्यात खूपत असलेले लोक त्यांच्याबद्दल वाटेल त्या कांड्या फैलावू लागले.

अशा या त्यांच्या वर्तनामुळे लोकांनी त्यांना कार्यक्रम देणे बंद केले. अनेक वेळा त्यांनी अशा स्थितीतून आपल्याला सावरण्याचा प्रयत्न केला पण नियतीला ते मान्य नव्हते. परत परत या घोडचूका त्यांच्या हातून घडू लागल्या. स्वत:ला सावरण्याच्या स्थितीच्या पलीकडे ते गेले. दुसऱ्या कलावंताबद्दल कधीही वाईट उच्चर न काढणारा, कधीही घमेंडीने न बोलणारा, असंख्य रसिकांच्या हृदयावर अनेक वर्षे राज्य करणारा, व्हायोलीनला बोलता करणारा, आपल्या रसीक चाहत्यांना, शेकडो शिष्यांना व आपल्या व्हायोलीनला दि. १० सप्टेंबर १९६४ रोजी पोरका करून वयाच्या अवघ्या ४४ व्या वर्षी अनंतात विलीन झाला.

'झाले बहु, होतील बहु, परी या सम हाच'

या महान कलाकाराच्या पवित्र स्मृतीस अभिवादन.

श्री. उल्हास पार्सेकर,
पार्से, भ्रमणध्वनी ८६६९१५१७१२

■■■

# एक समाज क्रांतिकारी......
# श्री. नारायण आ. कारवारकर मराठे



श्री. नारायणराव आपाजी मराठे कारवारकर (यांच्या सामाजिक संघर्षमय जीवनाची गाथा आजच्या पिढीला व्हावी अशी केंद्रीय समितीला वाटते. म्हणून हा लेख प्रसिध्द करण्यात आला.)

माशेलमध्ये त्यांचा जन्म झाला. त्यावेळची सामाजिक स्थिती अशी होती की, व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिविकासाची संधी सर्वसामान्य माणसाला त्याच्या ज्ञातीच्या आधारावर नकारली जात होती. तथाकथित निम्नवर्गातील मुलांना शाळांतून निर्भत्सना करून हाकललेही जायचे. अशाच ज्ञातीत श्री. नारायणराव जन्मले असल्याने, त्या वर्गात जन्मलेल्या व्यक्तिच्या स्वातंत्र्याकांक्षेच्या होणाऱ्या कोंडीचा साक्षात अनुभव त्यांनी घेतला होता.

जोवर समाज व्यवस्थेतील ही कोंडी फुटत नाही व नवीन सामाजिक मूल्ये प्रस्थापित होत नाहीत, तोवर मंदीराच्या परिसरात राहणाऱ्या देवदासी समाजाच्या स्थितीत काहीही फरक पडणार नाही याची त्यांना कल्पना आली होती.

उच्चवर्णीय समाजाने आपल्या संपत्तीच्या व शिक्षणाच्या जोरावर, ख्रिस्ती समाजाला आपल्या बाजूने करून घेवून बहुजन हिन्दू समाजाची पिळवणूक चालवली होती. तो पोर्तुगीज सत्तेच्या जवळ वावरणाऱ्यांचा काळ होता.

आजही त्यावेळच्या शोषणाच्या, सामाजिक, शैक्षणिक नाकेबंदीच्या गोष्टी ऐकल्या की मनाचा थरकाप उडतो.

या काळात, प्रवाहाच्या विरोधात जावून शोषित समाजातील धुरीणांनी जो संघर्ष उभा केला, तो संघर्ष आज एका शक्तिशाली व प्रगत समाजरुपाने, म्हणजेच 'गोमन्तक मराठा समाज' या नावाने ओळखला जात आहे. धुरीणांनी त्या त्या वेळच्या पददलीत समाजाला न्यून-गंडाच्या गर्तेतून बाहेर काढून आत्मविश्वासाने व ताठ मानेने जगायला शिकवले. त्यातीलच एक थोर समाजधुरीणी म्हणजे 'बाबा' तथा नारायण आपाजी मराठे कारवारकर.

श्री. नारायण कारवारकरांनी समाजाचे व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिविकास हा आपल्या जीवनाकार्याचा केन्द्रबिन्दु मानला. शंभर वर्षाचे झालेत तरीसुद्धा एका तरुणाला लाजवू शकणारी जिद्द व समाजकार्य करण्याची तळमळ त्यांच्या ठायी होती. या क्षणापर्यंत तरी



त्यांचे मार्गदर्शन आणि मोलाचा सल्ला त्यांना भेटणाऱ्या प्रत्येकाला मिळत होता. माझा व त्यांचा गत ४० वर्षांचा अनुभव. माझ्यावर त्यांनी पुत्रवत प्रेम केले. त्यांच्या उतारवयात प्रत्येक वेळी त्यांना भेटायला जाताना वाटायचं की वयोमानानुसार त्यांना विस्मृति जडलेली असेल किंवा ते थकलेले असतील. परन्तु छे! तो पूर्वीचाच जोम आणि आवेश, त्याच पूर्वीच्याच शैलीत विचारांचे स्पष्ट आदान-प्रदान! विचारात कुठेही शैथिल्य येवू न देता नित्य नूतन कल्पना मांडणारे नाबाद शतकवीर बाबा कारवारकर मराठे ते समाजभूषणच वाटावेत.

उच्चवर्णीयांच्या देवस्थानात देवधर्माच्या नावाखाली आणि देवाच्या 'सेवेच्या' नावाखाली 'देवदासी' प्रथा गोमन्तकात त्यांनीच निर्माण केली. या अनीतीकारक धंद्याचा प्रसारही स्वत:चे चोचले पुरविण्यासाठी त्यांनी प्रसंगी दमदाटी करूनही चालू ठेवला. त्यामुळे होणाऱ्या गोव्याच्या बदनामीची कोणी पर्वा केलीच नाही. देवदासी स्त्रियांनी भक्तिभावाने देवाची आणि महाजन समाजाती देवचारांची सेवा अंधश्रध्देपोटी करावी आणि पुरुष मंडळीने अशिक्षित, परावलंबी, दारुबाज आणि गुलामगीरीचे जीवन कंठावे हा जणू तथाकथित उच्च-समाजमान्य प्रघातच होवून बसला. या समाजाच्या अंगी वाद्य, नृत्य, संगीत, नाट्य, शिल्प, चित्रकला अशा पराकोटीच्या कला स्वाभाविकरीत्या असूनही तुच्छ, अपमानीत जीणे जगण्यावाचून त्यांना पर्याय नव्हता. ही स्थिती नित जीणे जगण्यावाचून त्यांना पर्याय नव्हता. ही स्थिती बदलणे फार गरजेचे होते. ते मोठे दूर्धर काम होते.

ते करत असताना उच्चवर्णिय तसेच हितशत्रूंचा आणि स्वकियांचा ही मोठा विरोध आणि सामाजिक अन्यायाचे चटके श्री. नारायण कारवारकरांना सहन करावे लागले.

शिक्षणाची आवश्यकता पटवून देण्यासाठी ते वणवण संपूर्ण गोवाभर भटकले. समाजातल्या अंधश्रद्धा सोडायला बरीचशी मंडळी तयार होत नव्हती परंतु धीर न सोडता त्यांनी चळवळ चालूच ठेवली आणि सहकाऱ्यांच्या मदतीने व पोर्तुगीज सरकार दरबारी काही कायदे करवून घेवून ही वाईट प्रथा बंद करण्यात ते यशस्वी झाले.

गोव्यातील मंदिराच्या आसपास वस्ती असलेल्या व मंदिरातील निरनिराळ्या सेवा

कार्यात गुंतलेल्या समाजात एक नव्हे अठरा पंगड जाति, उपजाती होत्या. त्या प्रत्येक उपजातीचा अभिनिवेश सोडायला लावणे सोपी गोष्ट नव्हती. शिक्षणाच्या प्रसाराने त्यात सुलभता आली.

१९२५-१९८० या कालखंडात सामाजिक चळवळीने बराच जोर धरला. या कालखंडात गोमन्तक मराठा समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी प्रबोधन हाच प्रमुख विषय मानला व त्यासाठी अनेक कार्यकर्ते झटले. कै. कान्त जांबावलीकरांनी तर इतका प्रखर संघर्ष केला की, त्यांना नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न समाजकंठकांनी केला. त्यांनी दिलेल्या लढ्यामुळे एकंदर समाजाचे चित्रच पालटले. संपूर्ण गोवाभर त्याचे पडसाद उलटले. फोंड्यातील काटकर व केरीतील केरकर घराण्याने या संघर्षात स्वत:ला झोकून दिले. सासष्टीत जोतकर, फातर्पेकर, वगैरे अन्य कुटुंबांनी या संघर्षात भाग घेतला. पेडणे, नानोडा, डिचोली या भागातूनही पाठिंबा मिळाला. कै. दिनानाथ मंगेशकरांनी आपल्या ऐन उमेदीच्या दिवसात या चळवळीत सहभाग घेतला. या सगळ्या व्यापाचे खरे सूत्रधार होते श्री. नारायण आ. कारवारकर.

या होमकुंडात उडी घेणारे कै. राजाराम पैंगीणकर यांना कसे विसरता येईल! काणकोण तालुक्यातील या अध्वर्यूने प्रतिज्ञाच केली की एक ना एक दिवस स्वाभिमान व स्वकर्तृत्वाच्या आधारावर हा समाज उच्च आसन ग्रहण करेलच करेल. कै. भाऊसाहेब बांदोडकर, श्रीमती शशिकलाताई काकोडकर, सुलोचना काटकर व अशा बऱ्याच वजनदार व्यक्तिंच्या सहभागामुळे चळवळ सशक्त बनली.

शिक्षणाच्या महत्वासंदर्भात केवळ प्रचार करून उपयोग नाही तर प्रत्यक्षपणे शाळा उघडून विद्यार्थ्यांची सोय करावी लागेल. जवळ जवळ २०हून जास्त शाळा उघडण्यात आल्या. पणजी सारख्या ठिकाणी विद्यार्थ्यांना राहून शिक्षण घेणे सुलभ व्हावे म्हणून नारायणराव मराठे कारवारकरांनी मळा भागात प्रशस्त जागेत गोमन्तक मराठा समाज गोवा चे एक विद्यार्थी वसतिगृह उघडले. केवळ समाजातीलच नव्हे तर सर्व जातीच्या व धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी या वसतिगृहाचे दरवाजे उघडेच राहिले हे विशेष. नारायणराव व त्यांच्या सौभाग्यवती कै. प्रमिलाबाई या दोघांनी मिळून या वसतिगृहाची धुरा सांभाळली. तेथे राहणाऱ्या मुलांवर पुत्रवत प्रेम केले. त्यांच्या आजारत त्यांची शुश्रुषा केली.

कारवारकर स्वत: उत्तम शिक्षक होते. वसतिगृहातील पीपल्स तसेच प्रोग्रेस हायस्कूल मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी, फ्रेंच, गणित या विषयात कधी कधी शून्य गुण देखील मिळायचे. हेच विद्यार्थी नारायणराव कारवारकरांनी हाताळल्यावर याच विषयात प्राविण्य संपादन करायचे.

बाबा फारच शिस्तप्रिय. त्यांचा दिवस सकाळी चार वाजता सुरू व्हायचा व रात्री

दहा वाजता संपायचा. सुट्टी त्यांनी कधीच घेतली नाही. सुट्टीच्या दिवशी समाजाच्या बैठका व अन्य कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी असायच्या.

गोव्यातील ग्रंथालय चळवळीलाही बाबांनी बरीच मोठी चालना दिली. पणजीला त्यांनी ग्रंथालय सुरु केले. या ग्रंथालयात विविध विषयाची भरपूर पुस्तके त्यांनी ठेवली. या ग्रंथालयाचे वैशिष्ट्य म्हणजे हे ग्रंथालय चोवीस तास उघडे असायचे. पणजीच्या सेंट्रल लाब्ररीला वेळेचे बंधन होते पण गोमन्तक मराठा समाजाच्या या वाचनालयात दीवे कधीच विझलेले मला आढळले नाहीत. अविरतपणे अभ्यास करण्यासाठी बरेच विद्यार्थी या ग्रंथालयात तेथील पोषक वातावरण पाहून येत असत.

आज दिसणारे बरेच शिक्षक, डॉक्टर, इंजिनियर्स, सरकारी अधिकारी गोमन्तक मराठा समाजाने स्थापन केलेल्या वसतिगृहात राहून गेलेले आढळतील.

गोवा मुक्तिनंतर पहिली व्याख्यानमाला कोणी पणजीत सुरु केली असेल तर ती कारवारकरांनी. श्री महालक्ष्मी मंदिरात प्रा. गोपाळराव मयेकरांचे पहिले व्याख्यान झाले. ही व्याख्यानमाला पणजीकरांसाठी बौद्धिक पर्वणीच होती.

नारायणरावांनी रक्ताचे पाणी करून केलेल्या प्रयत्नांना फार मोठे यश लाभलेले आहे. देशाच्या इतर भागात ठाण मांडून बसलेल्या 'देवदासी' प्रथेचा गोव्यात आता लेशही उरलेला नाही. शिक्षण व सामाजिक प्रबोधनासाठी त्यांनी जीवनभर धरलेल्या आग्रहामुळे समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात गोमन्तक मराठा समाजाचे स्वाभिमानाने भरलेले घटक बांधव अग्रस्थानी झळकताना आज समाज बघत आहे. हा कळस आहे. त्यासाठी नारायण कारवारकरांना पाया बनावे लागलेले आहे याचे कदापि विस्मरण पडू नये.

नारायणरावांचे कार्य पाहून त्यांचा 'गोव्याचे आगरकर' असा गोव्यातील वृत्तपत्रांनी केलेला गौरव शब्दश: सार्थ असाच आहे. जीवनात त्यांचे अनेक सन्मान झाले. त्यापैकी गोव्याच्या स्वातंत्र्यदिनी गोव्याचे मुख्यमंत्री नामदार श्री. प्रतापसिंग राणे यांच्या हस्ते गोवा सरकारतर्फे १९९५ वर्षी सत्कार करण्यात आला. तसेच गोमंतविद्या निकेतन, मडगांव संस्थेतर्फे समर्पित भावनेने समाजकार्य केल्यामुळे संस्थेचा पुरस्कार त्यांना देण्यात आला. अशा या ऋषितुल्य व्यक्तिमत्वाचे निधन १३ मे २००७ रोजी त्यांच्या निवासस्थानी मिरामार येथे झाले.

आ. नम्र,

**श्री. दिपक सु. बाणस्तारकर**

करमळी, कोर्लीम, गोवा

■■■

# गोमंतक मराठा समाजातर्फे
# स्व. श्रीमती शशिकलाताई काकोडकर यांना श्रध्दांजली

गोमंतक मराठा समाज गोवातर्फे समाजभगिनी व गोमंतकाच्या माजी मुख्यमंत्री स्व. श्रीमती शशिकलाताई काकोडकर यांना त्यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त गोमंतक मराठा समाजाच्या मध्यवर्ती कार्यालयात भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

भाऊसाहेब बांदोडकर यांनी गोमंतकाच्या विकासाची मुहुर्तमेढ रोवली आणि स्व. ताईंनी त्यावर कळस चढविण्याचे कार्य करताना भाऊंची स्वप्ने पूर्णत्वास नेली. समाज, राजकारण, उद्योग, शिक्षण या क्षेत्रामध्ये गोव्याला प्रगतीपथावर नेले हे समाजबांधवांसाठी भूषणावह होय, असे प्रतिपादन गोमंतक मराठा समाजाचे अध्यक्ष गोरख मांद्रेकर यांनी याप्रसंगी केले. यावेळी समाजाचे उपाध्यक्ष नंदकिशोर शिरगांवकर, सचिव प्रशांत मांद्रेकर, सहसचिव किरण बाळ्ळीकर उपस्थित होते.

समाजाचे अध्यक्ष गोरख मांद्रेकर यांनी दीपप्रज्वलन केले. मान्यवरांनी पुष्प अर्पण करून श्रध्दांजली वाहिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर्मचारी वर्गाने सहकार्य केले.



**'तृतीय पुण्यस्मरण' २८.१०.२०१९**

■■■

# एप्रिल २०१७ ते डिसेंबर २०१९ – एक आढावा

१. सुधारीत शिष्यवृत्ती योजना तयार करून शिष्यवृत्ती व आर्थिक मदत अशी विभागणी करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा निकष लावण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेनुसार वर्गीकरण करून शिष्यवृत्ती वितरण सुरू केले.

२. वनखाते इमारत भाडे मे २०१५ ते एप्रिल २०१७ पर्यंतची थकबाकी कार्यकारी मंडळीने वसूल करून घेतली. र. २६ लाख खात्यात जमा करून घेतले. सध्या वनखात्याकडे कोणतीही थकबाकी नाही. नविन भाडे करार करून भाडे वसूल केले.

३. LCD Projector issue समोपचाराने मिटविण्यात समिती यशस्वी झाली. सध्या LCD Projector कार्यालयात आहे.

४. शैक्षणिक कर्ज घेतलेल्या मुलांना परतफेड करण्यासाठी पत्र पाठवले, तसेच नोकरी किंवा उद्योग करण्याऱ्या मुलांना कर्जाचे किमान पैसे भरण्याचे आवाहन करून आजपर्यंत बऱ्यापैंकी वसूली झाली आणि होत आहे.

५. घटना दुरूस्ती – श्री. चंद्रकांत कवळेकर व घटना समिती यांच्या मार्गदर्शनाखाली आणि इतर सर्व सभासदांच्या सहकार्यामुळे घटना दुरूस्ती करून नोंदणी कार्यालयाकडून शिक्कामोर्तब करून घेतले.

६. **इमारत दुरूस्ती :**

- आपल्या सभागृहाचे छप्पर दुरूस्तीचे काम पूर्ण केले पूर्वीचे सिमेंटचे पत्रे काढून त्यावन नवीन वजनाचे हलके पत्रे बसवले.
- दयानंद स्मृति सभागृहाचे रंगकाम, संपूर्ण इलेक्ट्रिक काम, खिडक्यांचे पदडे, सिलींगचे काम, व्यासपीठ सुशोभिकरण करण्यात आले.
- व्यासपीठाकरिता रेड कार्पेट खरेदी करण्यात आले. सभागृहातील खुर्च्याकरीता कव्हरची खरेदी केली.
- मिनी हॉलची रंगरंगोटी, स्टेअरकेसची रंगरंगोटी करण्यात आली. ए.सी. बसविण्यात आली.
- इमारतीची आतून केमिकल वापरून दुरूस्ती करण्यात आली.
- इमारतीच्या मधल्या चौकासाठी लोखंडी जाळी बसविण्यात आली.
- मिनी हॉल करिता १६ x १२ चे, व्यासपीठ उभारण्यात आले.
- मुख्य सभागृहाच्या व्यासपीठावर कार्यक्रमच्यावेळी विद्यूत प्रवाह अखंडीत रहावा म्हणून व्यासपीठाकरिता इनव्हर्टर बसविण्यात आला.

७. **मळा हॉस्टेलची दुरूस्ती केली**

- मळा हॉस्टेलमध्ये शिवणवर्ग व भजनी वर्ग सुरू करून न्यायालयीन खटला मजबूत केला.
- मळा हॉस्टेलच्या पुर्न नळ जोडणीचे काम अंतिम टप्प्यात आहे.
- मळा हॉस्टेलमधील शिवणवर्गाकरीता इडीसी कडून जीएसआर योजनेअंतर्गत शिलाई मशीन व इतर साहित्याकरिता रु. १५० लाख मदत मिळवून घेतली.

८. प्रत्येक तालुक्यात जमिन खरेदीचा उद्देश ठेऊन त्या अंतर्गत काणकोण तालुक्याकरिता २५०० चौ.मी. जागा खरेदी केली.

९. डिचोली जागेची कायदेशीर लढाई संपूष्टात आली असून कागदोपत्री व्यवहार पूर्ण झाला. एनए कार्यवाही सुरू आहे.

१०. कै. भाऊसाहेब बांदोडकर पुण्यतिथी : भाऊंना आदरांजली देण्याच्या उद्देशाने केंद्रीय समितीने आपल्या या कार्यकाळात राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करून राज्यातील विद्यार्थी, शिक्षक यांना त्यामध्ये सहभागी करून घेतले.

११. आपल्या समाजातील ज्येष्ठ व श्रेष्ठ कलाकारांना आदरांजली वाहण्याकरिता २०१८ पासून संगीत समारोहाचे आयोजन करण्यास प्रारंभ केला. प्रथमच कला व संस्कृती संचालनालय-गोवा यांच्याकडून कार्यक्रमासाठी अनुदान मिळविण्यास प्रयत्न केले.

१२. गोमंतकाच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री कै. श्रीमती शशिकलाताई काकोडकर यांच्या पुण्यतिथीदिनी (२८ ऑक्टोबर ) श्रध्दांजली वाहण्यात येते. यंदा त्याच्या जयंतीदिनी मंगळवार ७ जानेवारी २०२० रोजी एका राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे निश्चित केले आहे. वरील दोनही कार्यक्रमासाठी बांदोडकर कुटुंबाकडून काही प्रमाणात आर्थिक मदत मिळत आहे.

१३. युवा समिती मार्गी लावली : प्रत्येक तालुक्यात युवा समिती गठित करण्यात आली. त्यापैकी काही युवा समित्या सक्रिय झाल्या आहेत.

१४. २०१७-१८ व २०१८-१९ या आर्थिक वर्षात बार्देश, फोंडा, सांगे, धारबांदोडा (तीन तालुक्यांनी संयुक्तपणे) यांच्या सहकार्याने वधुवर मेळावे आयोजित केले.

१५. २०१७ मध्ये एकत्रित असलेल्या कायम ठेवीची विभागणी करून ४.२५ टक्के व्याजदराने कायम ठेवी ठेऊन प्रति वर्षी रु. ६,९००.०० वरून १२,६०००० मिळवण्यास प्रारंभ झाला.

१६. Fire Safety : Fire Safety चे काम पूर्णत्वाकडे झाले असून Automatic Pumping system आणि Pumping sचे काम लवकर घेण्यात येईल.

■ ■ ■

# सुधारीत घटना आवृत्ती

आपल्या समाजातल्या मुळ घटनेत बदल केल्यास बरीच वर्षे झाली होती. साधारणतः २००३ वर्षापूर्वी घटनेत बदल करण्यात आले होते. आज त्यानंतर वर्षांनी आपल्या एकंदर कार्यपध्दतीत बरेच बदल झाले आहेत. त्यात प्रामुख्याने सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रांचा समावेश आहे. या सर्वांचा विचार करून कार्यकारी समितीने घटना दुरूस्ती करण्याचा निर्णय घेतला. ४ ऑक्टोबर २०१७ रोजी आमसभेमध्ये घटना दुरुस्तीचा ठराव मंजुर करण्यात आला व घटना समिती निवडण्यात आली. त्या ज्येष्ठ समाजबांधव व या क्षेत्रातील तज्ञ समिती मधील चंद्रकांत कवळेवर यांच्यावर घटना दुरूस्तीच्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली.

२५ फेब्रुवारी २०१८ रोजी केंद्रिय समिती सल्लागार समिती व तालुका प्रतिनिधी यांच्या संयुक्त बैठकीत श्री. चंद्रकांत कवळेकर यांनी घटना सादर केली व मसूद्यावर चर्चा होऊन दुरूस्त्या सुचविण्यात आल्या. यानंतर ३ मार्च २०१८, १५ मार्च २०१८ रोजी बैठका झाल्या. यावेळी विविध मुद्‌द्यावर चर्चा झाली. त्यामध्ये मोहनदास लोलयेकर, ॲड. मनोज बांदोडकर, सुभाष साळकर, अरविंद वाडीकर, ॲड. सुरेश काणकोणकर, अविनाश रामनाथकर, प्रशांत मांद्रेकर, किरण बाळ्ळीकर व इतरांनी अनेक सूचना केल्या.

ऑक्टोबर २०१८च्या आमसभेत ढोबळ मसुद्यावर चर्चा झाली. पुन्हा काही सूचना–दुरूस्त्या सुचविण्यात आल्या. ती दुरूस्ती करून समितीने त्यानंतर २७ जाने २०१९, २४ फेब्रुवारी २०१९ रोजी घेण्यात आलेल्या बैठकांमध्ये अंतिम मसूदा निश्चित केला. ७ एप्रिल २०१९ च्या आमसभेत अंतिम मान्यता देण्यात आली.

सदर अंतिम मसुद्याला सरकारी खात्याची मान्यता मिळाली असून या घटनेच्या प्रतिंची छपाई करण्यात आलेली आहे. केंद्रिय समिती, सल्लागार, तांत्रिक, तालुका, युवा, महिला समिती त्याचबरोबर तालुका सल्लागार या सर्वांना प्रति देण्यात येतील. या व्यतिरिक्त कोणत्याही समितीवर नसलेले परंतू ऑक्टोबर २०१८ आणि एप्रिल २०१९च्या आमसभेत उपस्थित सभासदांनाही प्रति देण्यात येतील.

याशिवाय इतर कोणाही सदस्यास ही प्रत हवी असल्यास तालुका समिती, केंद्रिय समिती किंवा समाजाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**सचिव**

**प्रशांत मांद्रेकर**

■■■

# द्वितीय संगीत समारोह - २०१९

आपल्या समाजातील संगीतमय धुरीणांना आदरांजली वाहण्याकरिता समाजातर्फे आयोजित केलेला द्वितीय संगीत समारोह शनिवार १९ व रविवार २० ऑक्टोबर २०१९ या दोन दिवसात अमाप उत्साहात संपन्न झाला. गतवर्षापासून या समारोहास प्रारंभ झाला, त्याचा मूळ उद्देशच होता की आपल्या समाजातील त्या थोर कलाकारांना, ज्यांनी खडतर वाटचाल करीत आपापल्या कुवतीप्रमाणे स्वररुपी सेवा रसिकांपर्यंत पोचवून संगीताचा वारसा पुढे नेण्याचा आणि संगीत जीवंत ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यांना आदरांजली वाहावी आणि आजच्या पिढीला त्या कलाकारांची ओळख व्हावी. परंतु इथेही काहीजणांनी दूधात मिठाचा खडा घालण्याचा प्रयत्न केलाच. तरीसुद्धा आपले समाजबांधव यापुढेही हा समारोह मोठ्या उत्साहाने साजरा करतील.

यंदाच्या या समारोहात आपल्या समाजाच्या युवा व बुजुर्ग कलाकारांनी आपली कला पेश केली त्यात अनुक्रमे कु. अर्चना कामुलकर, पं. तुळशीदास नावेलकर, श्री. नरेंद्र कोठंबीकर, श्रीमती मिना फातर्पेकर, नितीन कोरगांवकर, अमर मोपकर यांचा समावेश होता. हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

दोन दिवशीय समारोहात गोव्याबाहेरील कलाकारांनीसुद्धा आपली कला पेश केली.

संमेलनाचा प्रारंभ कु. अर्चना कामूलकर आणि डॉ. प्रदिप सरमोकादम यांच्या नाट्य व भक्तिसंगीताने झाला. युवा प्रतिभेच्या या गोमंतकीय गायक-गायिकेने स्वरांची बरसात करत आपल्या गायकीची छाप रसिकांवर पाडली आणि शाबासकी मिळविली.

## उद्घाटन सोहळा

पद्मश्री पं. प्रसाद सावकार, ज्येष्ठ गायिका मिना फातर्पेकर, समाजाध्यक्ष गोरख मांद्रेकर, समारोह समिती सदस्य पं. कमलाकर नाईक, पं. तुळशीदास नावेलकर, पं. उल्हास वेलींगकर, उपाध्यक्ष नंदकिशोर शिरगांवकर, सचिव प्रशांत मांद्रेकर व खजिनदार उमाकांत धारगळकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी पद्मश्री पं. प्रसाद सावकार यांच्या हस्ते श्रीमती मिना फातर्पेकर यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना पद्मश्री पं. प्रसाद सावकार यांनी समाजाबद्दल गौरवोद्गार काढले. ते म्हणाले आपल्या समाजाने विविध क्षेत्रात योगदान दिले आहे आणि एका अर्थी देशसेवाच केली आहे.

श्रीमती मिना फातर्पेकरांनी सन्मानाबद्दल समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करून आज



आपल्या आनंदाचा आणखी एक क्षण आपण अनुभवत असल्याचे म्हटले.

माननीय मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री. चंद्रकांत (बाबू) कवळेकर यांची उपस्थिती स्फूर्तिदायक ठरली.

समाजाध्यक्ष गोरख मांद्रेकर यांनी स्वागत केले. प्रा. गोविंद भगत यांनी सूत्रसंचालन तर सचिव प्रशांत मांद्रेकर यांनी आभार प्रदर्शन केले. पं. प्रसाद सावकार व इतर मान्यवरांनी दीप प्रज्वलन करून समारोहाचे औपचारीक उद्घाटन केले.

प्रथम दिवसाचा समारोप ज्येष्ठ गायिका श्रीमती मिना फातर्पेकर यांच्या गायनाने झाली. त्यांनी भिपपलास राग आळविला आणि नंतर नाट्यपदे सादर केली. कार्यकारिणी सदस्य सतिश पैंगिणकर, साबाजी केरकर, सौ. सुनिता पेडणेकर, हेमंत वेलींगकर यांनी मान्यवरांना पुष्पगुच्छ प्रदान केले.

दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात पं. तुळशीदास नावेलकर व त्यांचे शिष्य संकेत खलप यांच्या तबला सहवादनाने रंगत आणली. तद्नंतर गोमंतकीय सुपुत्र, समाजबंधू





ज्येष्ठ गायक श्री. नरेंद्र कोठंबीकर यांचे गायन झाले. मिया की तोडी राग आळवल्यावर त्यांनी नाट्यपदे सादर केली.

संध्याकाळच्या सत्रात हुबळी (कर्नाटक) येथील बालकलाकार आदित्य जोशी याने आपल्या बासरी वादनाने रसिक श्रोत्यांची मने जिंकली.




द्वितीय संगीत समारोहाची सांगता किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक पं. गिरीश संझगिरी यांच्या गायनाने झाली.

संमेलनात नितीन कोरगांवकर, दत्तराज म्हाळशी, अमर मोपकर, दयेश कोसंबे, अमर मोपकर, सुभाष फातर्पेकर, प्रसाद गावस, तुकाराम बिटये गोवेकर, दयानंद कांदोळकर यांनी साथसंगत केली.

या समारोहास कला व संस्कृती संचालनालयाने भरीव अशी आर्थिक मदत केली आहे त्याबद्दल त्यांचे आभार.

तृतीय संगीत समारोह हा आपल्या समाजातील एखाद्या ज्येष्ठ व श्रेष्ठ दिवंगत कलाकारांस समर्पित करण्याचा ठराव आमसभेमध्ये संमत करण्यात आला आहे. संगीत समारोह समिती त्याबाबत निर्णय घेतील.



■■■

# युवा समिती पेडणे - आकाशकंदिल स्पर्धा

पेडणे तालुका युवा समितीने यंदा प्रथमच तालुकास्तरावर समाजातील बांधव-भगिनीकरिता आकाशकंदील स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये तालुक्यातील १० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. प्रसिध्द चित्रकार, मुर्तिकार व कला शिक्षक श्री. संजय मुरारी म्हामल यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले.

पेडणे तालुका युवा समिती अध्यक्ष विशांत मांद्रेकर यांनी विशेष परीश्रम घेतले.

स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे -

१. यतिन शेट्ये - पेडणे
२. मृण्मयी मांद्रेकर - मांद्रे
३. राखी नाईक - तुये

**उत्तेजनार्थ**

१. विपूल मांद्रेकर - मांद्रे
२. अर्चना कामुलकर - पेडणे
३. संपत्ती मांद्रेकर - मांद्रे

सर्वांचे आभार

## शैक्षणिक आर्थिक सहाय्य निधी

श्री.उमेश अच्युत नाईक, पर्वरी-गोवा यांच्याकडून शैक्षणिक आर्थिक सहाय्य निधीसाठी रु.६०००/- संस्थेला देण्यात आले. त्याबद्दल त्यांचे धन्यवाद. अन्य समाज बांधव सदर निधी देण्यास इच्छूक असल्यास कृपया कार्यालयात संपर्क साधावा.

■■■



केंद्रिय समिती पदाधिकारी उनुक्रमे अध्यक्ष गोरख मांद्रेकर, उपाध्यक्ष नंदकिशोर शिरगांवकर, सचिव प्रशांत मांद्रेकर, सहसचिव कीरण बाळ्ळीकर, सदस्य सतीश पैंगीणकर, काणकोण तालुकाध्यक्ष रमाकांत बांदेकर व इतर यांनी काणकोण जागेस भेट देऊन कुंपण व साफसफाईची पाहणी केली.

■■■

# फोंडा तालुका गोमंतक मराठा समाजातर्फे बाल आनंद दिवस साजरा

फोंडा तालुका गोमंतक मराठा समाज महिला विभागात तर्फे बाल आनंद दिन मातृछाया संचलीत अनाथ आश्रमात मुलांच्या सान्निध्यात मोठ्या उत्साहात व विविध स्पर्धा आयोजित करून यशस्वी साजरा केला. सदर कार्यक्रमास दि दयानंद अर्बन पतसंस्थेचे अध्यक्ष रंजन कवळेकर खास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. खास स्पर्धा व मिठाई वाटून बालदिन साजरा केला. प्रा. रंगिता आनंद वाघुर्मेकर व ज्योती नागेशकर यांनी बालदिनाच्या शुभेच्छा दिल्या व दिवसाचे महत्व सांगितले. अनुराग म्हार्दोळकर, सिध्दी वाघुर्मेकर, प्राजक्ता वाघुर्मेकर, सृष्टी पेरणी, प्रविणा कवळेकर यांनी विविध स्पर्धा घेतल्या. व्यवस्थापन ज्याला कवळेकर, शांतल कवळेकर, उर्वशी रामनाथकर यांनी पाहिले.

आयुष्य वाघुर्मेकर यांनी बक्षिसे जाहीर केली. अध्यक्ष रंजन कवळेकर यांच्या हस्ते वितरीत करण्यात आली. मातृछाया संचालिका मंदाकिनी पाटील व मिनाक्षी कदम यांनी सहकार्य केले. शेवटी खजिनदार शैला कवळेकर यांनी आभार प्रदर्शन केले. वरील १७ नोव्हेंबर २०१९ रोजी मातृछाया संचलित अनाथ आश्रम, कपिलेश्वरी, फोंडा येथे आयोजित केला होता.





# गोमंतक मराठा समाज महिला विभागातर्फे फोंड्यात प्लास्टिकविषयी जनजागृती

गोमंतक मराठा समाज फोंडा तालुका महिला समितीतर्फे म्हार्दोळ व मंगेशी येथील सर्व वाड्यावरील प्रत्येक घरात भेट देऊन प्लास्टिकचा दुष्परिणाम व पर्यावरणाची हानी पटवून देणारी पत्रके वाटून जन जागृती करण्यात आली. यावेळी एकूण ६०० पत्रकांचे वाटप करण्यात आले. वेलिंग प्रियोळ पंचायतीच्या विद्यमान पंच संजना गावडे यांच्या हस्ते खास छापण्यात आलेल्या प्लास्टिकचा वापर या विषयावर पत्रकांचे अनावरण करण्यात आले. अनावरणावेळी पंच गावडे यांनी गोमंतक मराठा समाज फोंडा तालुका महिला समितीचे अभिनंदन केले.

अशा जनजागृतीसाठी इतर संस्था बचत गट यांनी सहभाग घ्यावा असे म्हटले. यावेळी अध्यक्षा ज्योती नागेशकर, उपाध्यक्षा रंगिता वाघुर्मेकर, शैला कवळेकर, सुवर्णा कोठंबिकर, अनुराधा म्हार्दोळकर, सिध्दि वाघुर्मेकर, सृष्टी पेरणी उपस्थित होते. यावेळी महिलांनी प्लास्टिक विरोधी घेयची काळजी यावरील पत्रके घरात दुकानात वाटली.




■■■

# फोंडा तालुकातर्फे शिक्षकदिनी सेवा निवृत्त व वर्तमान शिक्षकाचा सत्कार सोहळा



आज महिला सर्वच क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने कार्यरत असून, त्यांना पुरूषांकडूनही उत्तम पाठबळ मिळत आहे. सामाजिक क्षेत्रांत वावरताना महिलांनी आपल्या कुटुंबाप्रती असलेल्या जबाबदाऱ्याही समर्थपणे पार पाडाव्यात, असे आवाहन समाजसेविका दीपाली बाणस्तारकर यांनी फोंड्यात केले.

तिस्क-फोंडा येथील गोमंतक मराठा समाज फोंडा तालुका महिला समितीतर्फे राष्ट्रीय शिक्षक दिनानिमित्त येथील थ्रिफ्ट सभागृहात आयोजित फोंडा तालुक्यातील ३२ आजी-माजी शिक्षिकांच्या सत्कार सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रशांत मांद्रेकर, समाजाच्या महिला समिती अध्यक्षा ज्योती नागेशकर, दयानंद अर्बनचे रंजन कवळेकर, आनंद वाघुर्मेकर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते फोंडा तालुक्यातील १० निवृत्त आणि २२ कार्यरत शिक्षिकांना शाल, गुलाबपुष्प आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

■■■

# सांगे तालुका आरोग्य शिबीर

सांगे तालुक्याच्यावतीने तालुक्यातील सर्व स्तरावरील लोकांकरिता मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन प्राथमिक आरोग्य केंद्र सांगेच्या सहकार्याने रविवार १७ नोव्हेंबर २०१९ रोजी आयोजित करण्यात आले. या शिबिरात एकूण १०५ जणांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली. या शिबिरात डॉ. महेश वेर्लेकर, डॉ. शिल्पा कायसूवकर व प्राथमिक आरोग्य केंद्र, सांगेच्या कर्मचारी वर्गाने मोलाचे योगदान दिले.

या शिबिराचे उद्घाटन दक्षिण गोवा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री नवनाथ नाईक यांच्याहस्ते दीप प्रज्वलन व भाऊसाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. समाजाध्यक्ष गोरख मांद्रेकर खास निमंत्रीत म्हणून तर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान ज्येष्ठ समाजबांधव गजानन कुर्डीकर यांनी भुषविले. समाजाचे उपाध्यक्ष नंदकिशोर शिरगांवकर, सचिव प्रशांत मांद्रेकर, सहसचिव किरण बाळ्ळीकर यावेळी उपस्थित होते.

योगगुरू राजू देसाई यांनी यावेळी आयुष्यात योगाचे महत्व कसे आहे? हे उपस्थितांना पटवून दिले. श्री दयानंद नाई यांनी सूत्रसंचालन केले तर तालुकाध्यक्ष विवेक नाईक यांनी प्रास्ताविक व स्वागत केले.

■■■

# धारबांदोडा तालुका – विविध स्पर्धा

गोमंतक मराठा समाज – धारबांदोडा तालुका समितीने दिवाळीच्या निमित्ताने रांगोळी स्पर्धा व पाककला स्पर्धा घेतली. त्यामध्ये रांगोळी स्पर्धेला एकूण ३८ स्पर्धक होते व पाककला स्पर्धेला आठ स्पर्धकांनी भाग घेतला. कार्यक्रमाचे बक्षिस वितरण दि. १४ नोव्हेंबर २०१९ रोजी करण्यात आले. त्यावेळी समाजबांधव श्री. मनोहर देविदास व खास अतिथी श्री. चंद्रशेखर ठाकूर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रनिवेदन मंगेश देवळी तर आभार प्रदर्शन मयुर देविदास यांनी केला. कार्यक्रमाला धारबांदोडा तालुक्यातील समाजबांधव उपस्थित होते.








■■■

# बार्देश तालुका – महिला आरोग्य मार्गदर्शन



गोमंतक मराठा समाज–बार्देश तालुका महिला समितीने Dream Touch यांच्या संयुक्त विद्यमाने महिला आरोग्य आणि मासिक पाळी या विषयावर कार्यशाळा घेतली होती. त्यावेळी प्रमुख पाहुण्या सौ. अरुणा राणे, गौतमी फडते व सौ. जिन्नत शेख उपस्थित होत्या. तसेच अभय पेडणेकर व सूरज फातर्पेकर उपस्थित होते. सौ. मानसी आजगांवकर यांनी स्वागत केले. वरील मान्यवरांनी महिला आरोग्य व मासिक पाळी व sanitary pad विषय मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मानसी आजगांवकर, शितल नाईक पेडणेकर, सुहासिनी नाईक, पौर्णिमा नाईक, दामिनी नाईक पेडणेकर, सुवर्णा पेडणेकर, अभय नाईक पेडणेकर, सौ. नेहा नाईक व इतर महिला उपस्थित होत्या. बार्देश तालुका महिला अध्यक्षा सौ. शरयु कोळवाळकर यांनी सूत्रनिवेदन व आभार मानले.



■■■

# शैक्षणिक आर्थिक सहाय्य-निधी - आवाहन

सभासदहो,

नमस्कार

२०१७-१८ एप्रिल मध्ये विद्यमान समितीने पदभार स्विकारल्यानंतर समाजाचे अध्यक्ष श्री. गोरख मांद्रेकर यांनी सर्व सभासदांना तसेच खास करून तालुका समिती पदाधिकाऱ्यांना एक आवाहन केले होते की ज्यांना शक्य असेल त्यांनी दरमहा एक ठराविक रक्कम समाजाच्या खात्यात 'शैक्षणिक आर्थिक सहाय्य निधी' उभा करण्याकरीता जमा करावी. त्यामागील उद्देश होता की हा 'शैक्षणिक निधी' नंतर समाजातील गरजू व निराधार विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करावा. तालुका समितीने प्रत्येकी तालुक्यातून असे किमान २० सभासद तयार करावेत परंतु या योजनेला अगदी अल्प प्रतिसाद लाभला. काही ठराविक समाजबांधवच या योजनेत सहभागी झाले आहेत. त्यामध्ये काही केंद्रिय समिती पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे.

अलिकडे समाजाचे ज्येष्ठ सदस्य, सल्लागार, श्री. उमेश नाईक सरांनी आपल्या ७५व्या वाढदिवसाप्रित्यर्थ रु. ६००० ची मदत या उपक्रमाकरिता समाजाकडे सुपूर्द केली आहे. त्याबद्दल सर्वप्रथम श्री. उमेश नाईक सरांचे आभार व्यक्त करतो.

आज केंद्रिय समितीकडे शालेय शिक्षणाकरीता, मुलांना मदत करावी म्हणून समाजबांधवांचे बरेच अर्ज येत आहेत. आर्थिक व तांत्रिक अडचणीमुळे आम्ही त्यांना मदत करण्यास असमर्थ आहोत.

या आवाहनाद्वारे सर्व समाजबांधव-भगिनी यांना विनंती करतो की आपण दरमहा किमान रु. २००/- या योजनेकरीता समाजाच्या खात्यात जमा करावे. किंवा आपल्या घरात एखादा सोहळा असेल तर त्यानिमित्त काही रक्कम जशी श्री. उमेश नाईक सरांनी दिली आहे तशी रक्कम समाजाकडे सुपूर्द करावी. या योजनेचे अर्ज कार्यालयात उपलब्ध आहेत.

या निधीच्या विनियोगाबाबत तुमच्याकडे कांही सुचना असतील तर त्याचे स्वागत आहे.

**टिप :** श्री. उमेश नाईक सरांनी रु. २५००० ११वी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वितरीत करण्याकरीता म्हणून समाजाकडे दिले आहे. आतापर्यंत खालील समाज बांधवांनी शैक्षणिक आर्थिक मदत केली आहे. यापैकी काही दर महिन्याला आजपर्यंत समाजाला या योजनेखाली सहाय्य करत आहेत. त्याबद्दल सर्वांचे आभार.

## CONTRIBUTION TOWARDS EDUCATION ASSISTANCE SCHEME FUND

1. Shri. Gorakh Rajaram Mandrekar, Parra Bardez
2. Shri. Mohandas Loliekar, Salcete
3. Shri. Umesh Achut Naik, Porvorim
4. Shri. Ritesh Jagannath Narvekar, Kundaim, Ponda
5. Shri. Kiran Ballikar
6. Shri. Amit Atul Nageshkar
7. Shri. Suresh Kankonkar
8. Shri. Rajiv Lolienkar
9. Shri. Umesh Achut Naik
10. Shri. Kuldeep Kamat
11. Shri. Goona Shankar Naik
12. Shri. Prashant Mandrekar
13. Shri. Sabaji Narayan Kerkar
14. Shri. Sagar Prabhakar Virdikar
15. Shri. Ranjan Mahadev Naik
16. Late Anil Chandrakant Naik
17. Shri. Sunita Prakash Pednekar
18. Shri. Goapal T. Naik
19. Shri. Satish Painginkar
20. Shri. Hemant Velingkar

# नूतन सभासद

| | | |
|---|---|---|
| १. | एश्वर्या उदय कारापूरकर | विद्यानगर, आकें, मडगाव |
| २. | अंकिता चंद्रकांत नाईक | अंबिर्णा, सुकुर, पर्वरी, बार्देश |
| ३. | साईली चंद्रकांत नाईक | अंबिर्णा, सुकुर, पर्वरी, बार्देश |
| ४. | आश्विनी उमेश नाईक | औद्योगिक वसाहत जवळ, डिचोली |
| ५. | उमेश मधुकर नाईक | औद्योगिक वसाहत जवळ, डिचोली |
| ६. | दिपाली दिलीप नाईक | कैलासनगर, अस्नोडा, बार्देश |
| ७. | नूतन गुरूनाथ तांबोसकर | विठ्ठल देवळाजवळ, तांबोसे, पेडणे |
| ८. | उदयराज गुरूनाथ तांबोस्कर उर्फ हडकर | विठ्ठल देवळाजवळ, तांबोसे, पेडणे |
| ९. | डॉ. उदय काकोडकर | पंटेमळ, कुडचडे |
| १०. | सचिन कुडणेकर | बोर्डे, डिचोली |
| ११. | अनिल विठाबाई देविदास | गुरववाडा, कुडणे, साखळी, डिचोली |
| १२. | भूषण नरसिंह कारापूरकर | मडगाव |

■■■

# नांदा सौख्यभरे

खालील नवं दांपत्यास पुढील आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

१. **चि. डॉ. अक्षर सुरेंद्र नाईक, मडगाव व चि. सौ. का. डॉ. विजेता रघूवीर जांबावलीकर** यांचा दि. २/१२/१९ रोजी विवाह संपन्न झाला.

२. **चि. समीर धनंजय देविदास, शेल्डे, केपे व चि. सौ. का. समिक्षा वेंगुर्लेकर** यांचा दि. ८/१२/१९ रोजी विवाह संपन्न झाला.

३. **चि. अखिल नाईक, मडगांव (नेत्रावळी) व चि. सौ.का. विनिशा विनय लोलयेंकर,** लोलयें-काणकोण यांचा दि. १/१२/१९ रोजी विवाह संपन्न झाला.

■■■

# अभिनंदन

१. **श्री. आनंद वाघुर्मेकर –** फोंडा तालुका सचिव
– M. Tech पदवी संपादन केल्याबद्दल अभिनंदन.

२. **श्री. भालचंद्र आमोणकर –** पणजी
लेखानिहाय खात्यामध्ये उपसंचालकपदी बढती मिळाल्याबद्दल अभिनंदन.

३. **श्री. उमेश नाईक व सौ. किशोरी उमेश नाईक –** पर्वरी, बार्देश–गोवा यांचे अमृत महोत्सवानिमित्त अभिनंदन.

४. **श्री. कुणाल किशोर कोरगांवकर –** म्हापसा
University of California कडून Phd - डॉक्टरेट प्रदान केल्याबद्दल अभिनंदन.

५. **श्री. रमाकांत बांदेकर –** अध्यक्ष काणकोण तालुका
यांचा गोवा सरकारने ज्येष्ट नागरीक म्हणून सन्मान केल्याबद्दल अभिनंदन.


६. **सौ. विंदा केशव नाईक –** ताळगांव, पणजी
यांचा गोवा सरकारने ज्येष्ट नागरीक म्हणून सन्मान केला म्हणून अभिनंदन.

७. **कु. अर्चना कामुलकर –** पेडणे
राज्यपातळीवरील गायन स्पर्धेत द्वितीय पारितोषिक प्राप्त झाल्याबद्दल अभिनंदन.

८. **कुणाल कमलाकर वेर्लेकर –** मार्शेल–फोंडा
राज्यपातळीवरील गायन स्पर्धेत द्वितीय पारितोषिक प्राप्त झाल्याबद्दल अभिनंदन.



श्री. आनंद वाघुर्मेकर



श्री. भालचंद्र आमोणकर



श्री. उमेश नाईक व
सौ. किशोरी उमेश नाईक



श्री. कुणाल किशोर
कोरगांवकर



श्री. रमाकांत बांदेकर



कु. अर्चना कामुलकर

■■■

# सहवेदना

१. **कै. श्री. राजेंद्र कुंडईकर,** (५८) धारगळ-पेडणे
निधन – ५ नोव्हेंबर २०१९

२. **कै. श्री. भगवंत स. देविदास,** पिर्ला, केपे
निधन – २४ ऑक्टोबर २०१९

३. **कै. सुमन शिवा नाईक,** (७८) पाळोळे, काणकोण
निधन – १३ नोव्हेंबर २०१९

४. **कै. सुनंदा गायक,** राजबाग, काणकोण
निधन – २७ ऑक्टोबर २०१९

५. **कै. विमल भास्कर गायक** , काणकोण
निधन – १७ जुलै २०१९

६. **स्व. निलेश रामनाथ काकोडकर,** काकोडा
निधन – १४ नोव्हेंबर २०१९

७. **स्व. अजिंक्य म्हार्दोळकर,** म्हार्दोळ-गोवा
निधन – १० डिसेंबर २०१९

८. **स्व. सुर्यकांत रामा नाईक** , खोर्ली, म्हापसा
यांचे हल्लीच निधन झाले.

९. **स्व. शिला शशिकांत कवळेंकर,** कवळें-फोंडा
निधन – २९ ऑक्टोबर २०१९

१०. **ब्रिजेश सतिश बांदेकर,** आगोंद, काणकोण यांचे निधन झाले.

११. **सौ. भागिरथी देविदास नाईक,** तिस्क सावर्डे यांचे निधन झाले.
त्या गजानन नाईक (माजी अध्यक्ष, सांगे) व रंजन नाईक (केंद्रिय समिती सदस्य) यांच्या भगिनी होत्या.

■■■